Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ६८ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.०१ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## ज्यांच्यामुळे पक्ष फुटला तेच विचारतात

# अजित पवारांनी पक्षासाठी काय केलं?-धनंजय मुंडे



**कर्जत**–अजित पवार म्हणजे शब्दाला जागणारा नेता, २०१४ ला निवडणूक हारल्यानंतर माझी लायकी न बघता विधान परिषदेची संधी दिली. पण ज्यांच्यामुळे अर्धा पक्ष फुटला ते आता विचारु लागले की, अजित पवार यांनी पक्षासाठी काय केले. असे म्हणत मंत्री धनंजय मुंडे यांनी शरद पवार गटाच्या जितेंद्र आव्हाड यांच्यावर निशाणा साधला. तर सांगलीत राहून स्व. आर. आर. आबांना कुणी त्रास दिला? असे म्हणत जयंत पाटलांचा देखील त्यांनी सल्ला दिला.धनंजय मुंडे म्हणाले की, शब्दाला जागणारा आणि तो शब्द पाळण्यासाठी जगणारा नेता एकच आहे आणि तो म्हणजे अजित पवार. काही जणांना वाटतं अजित पवार यांनी लगेच मागणी पूर्ण करावी, परंतु ते शक्य नाही. त्यांनी जर शब्द दिला तर तो पाळल्याशिवाय राहत नाहीत. अजित पवारांनी अनेकांना अनेक जबाबदाऱ्या दिल्या, २०१४ ला निवडणूक हरल्यानंतर माझी लायकी न बघता विधानपरीषदेची संधी दिली. अजित पवार यांनी मला पक्षत घेतलं नसतं तर परळी विधानसभा मतदारसंघ आपण जिंकला असता का?निरंजन डावखरे, गणेश नाईक यांना कुणाला कंटाळून पक्ष सोडावं लागला याच उत्तर द्या, असे म्हणत धनंजय मुंडे यांनी शरद पवार गटाच्या जितेंद्र आव्हाड यांच्यावर निशाणा साधला आहे. अजित पवार यांनी जे काम केलं ते कधी सांगत नाही. ज्यांच्यामुळे अर्धा पक्ष फुटून गेला तो विचारतो अजित पवारांनी पक्षासाठी काय केलं? असाही टोला त्यांनी लगावला.स्वर्गीय आबा जिवंत असते तर त्यांनी सांगितलं असतं की, सांगलीत राहून सांगलीतच कुणी कसा त्रास दिला असं म्हणत धनंजय मुंडे यांनी जयंत पाटील यांना टोला लगावला. सुनिल शेळके यांना पक्षात घेण्यापूर्वी तिकीट जाहीर झालं, ते कुणी केलं? असाही त्यांनी प्रश्न विचारला. त्यावेळी सामाजिक न्यायाची जबाबदारी मला कुणी दिली माहिती नाही, पण मला वाटतं त्यावेळी अजित पवार यांच्या हातात तो निर्णय नसावा असेही मुंडे म्हणाले.गारपीट आणि अतिवृष्टी झाली आहे. रब्बी आणि फळ पिकाचं नुकसान

झालं आहे. बुधवारी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी पंचनामे करण्याचें आदेश दिले आहेत. शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. बाजरी आणि ज्वारी साठी पीक विम्यासाठी आज शेवटची तारीख होती त्यात मुदत मिळावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. हा पाऊस सर्वदूर नाही, काही भागात जास्त, काही भागात मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला आहे. ज्या ठिकाणीं अतिवृष्टी गारपीट झाली आहे तिथं पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे असं म्हणत धनंजय मुंडे म्हणाले की, यावेळी ऐतिहासिक अशी बाब घडली. १ कोटी पेक्षा जास्त लोकांनी पीक विमासाठी अर्ज केला. १ हजार ९५४ कोटी रुपयांच वाटप देखील झालं आहे. ८७ हजार शेतकरी टेक्निकल गोष्टीमुळे पीक विमा लाभ घेऊ शकले नाहीत त्यांच्याबाबत देखील निर्णय होईल. ५० लाख शेतकऱ्यांना पीक विमा लाभ मिळाला आहे.

## मूल येथील नव्याने तयार झालेल्या व्यापारी संकुलला क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले व्यापारी संकुल असे नाव द्या.

### राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अजित पवार गटाची आग्रही मागणी



**मूल । प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधत मूल शहरांमध्ये नगरपरिषदेने नव्याने तयार केलेल्या व्यापारी संकुलला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व्यापारी संकुल असे नामकरण करण्याची आग्रही मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या (अजित पवार गट )वतीने मूल नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना निवेदनातून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मूल शहर अध्यक्ष आकाश येसनकर यांनी केली. महात्मा जोतीराव फुले 'पुणे कमर्शियल आणि कॉट्रॅक्टींग कंपनी' चे कार्यकारी संचालक होते. एक अव्वल दर्जाचे यशस्वी उद्योगपती, व्यापारी आणि नामवंत शेतकरी म्हणून महात्मा जोतिरावांचा नावलौकिक होता. या कंपनीने धरणं, कालवे, बोगदे, पूल, इमारती, कापडगिरण्या, राजवाडे, रस्ते आदींची भव्य आणि देखणी बांधकामं केली. जोतीरावांच्या उद्योगपती, कार्यकारी संचालक, अर्थतज्ज्ञ आणि शेअर मार्केटविषयक योगदानाकडे जाणकारांचं अद्याप पुरेसं लक्ष गेलेलं नाही.आता च्या व्यापारी तत्वावरील सर्व व्यवहारा मध्ये भ्रष्ट व्यवहार आढळून येतात.त्यानी खडकवासला धरणाच्या बांधकामात दिलेल्या योगदानातील त्यांचा स्वच्छपणा वाखानण्या जोगाच! व्यापार ,उद्योग क्षेत्रात दिलेले योगदान,त्यातून मिळालेले न्याय्य आणि प्रामाणिकपणाचे धडे त्यांच्या स्मृतीला उजाळा देण्या इतकेच महत्त्वाचे. त्यांच्या कार्याचा उदो उदो करण्याची संधी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ मुल शहराला नामकरणाच्या माध्यमातून मिळत आहे.रंगमंचावर झालेल्या नगरपालिकेच्या व्यापारी संकुलला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व्यापारी संकुलन असे नामकरण करण्यात यावे ही निवेदनाद्वारे नम्र विनंती करण्यात आली.सदर मागणी ला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे मूल तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार,राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे रोहित कामडे आ.भा.समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्रा.विजय लोनबले,हसन वाढई,कैलाश चलाख, गुरु गुरनुले, विवेक मुक्तेलवार , नलिनी आडपवार, शोभा बेलसरे, समता बनसोड, राधिका बुक्कावार, मनोज दाबणपल्लीवर,यांनी पाठिंबा दर्शिवला. निवेदन देताना राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष आकाश येसनकर,महेंद्र गोगले,प्रणय रायपुरे,रजत कुकडे, निहाल गेडाम,वतन चिकाटे, रुपेश मेश्राम, तरबेज सय्यद, उबेद शेख, रोहित खोब्रागडे, साहिल बारसागडे, मंथन सिडाम, कमरान खान, शुभम बंडीवार, राहुल वाघमारे, निलेश वाळके, कृष्णा बोरेवार, प्रविण बोबाटे, शुभम निगमगडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## ९ डिसेंबरला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा गडचिरोलीत

### कोनसरी येथील लॉयड्स मेटल्स च्या स्टील प्लांट चे उद्घाटनासह वडसा गडचिरोली रेल्वे चे भूमिपूजन करणार



**गडचिरोली । प्रतिनिधी**

देशाचे गृहमंत्री तथा भाजपचे नेते अमित शहा हे ९ डिसेंबर रोजी गडचिरोली जिल्ह्यातील कोनसरी येथे येणार असून खासदार अशोक नेते यांच्या प्रयत्नातून मंजूर आणि पूर्ण झालेल्या विकास कामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन करणार आहेत. अशी माहिती खासदार अशोक नेते यांनी गुरुवारी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी आमदार डॉ देवराव होळी, जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे, भाजपचे ज्येष्ठ नेते बाबुराव कोहळे, महाभारत खटी, यांचेसह अनेक मान्यवर उपस्थित होते.खा. नेते यांनी यावेळी सांगितले की केंद्र आणि राज्य सरकारच्या सहकार्यातून आणि त्यांच्या प्रयत्नांमुळे गडचिरोली जिल्ह्यात लॉयड्स मेटल्सच्या लोहप्रकल्पातून ऊद्योग विरहीत जिल्ह्यात तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या लोहखनिज प्रकल्पाचे उद्घाटन आणि ३००० कोटींच्या प्लॅनेट प्लांटचे भूमिपूजन गृहमंत्री अमित शहा करणार आहेत. यासह वडसा ते गडचिरोली या ५२. २८ किमी रेल्वेमार्गच्या १८८८ कोटी रुपये खर्च करून होणाऱ्या बांधकामाचे ऑनलाईन भूमिपूजन आणि चिचडोह बॅरेजचे ऑनलाईन उद्घाटनही ते करणार आहेत. या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार हे प्रामुख्याने उपस्थित असणार आहेत. या मुळे जिल्ह्यातील रोजगाराभिमुख विकासकामांना गती मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.जिल्ह्यातील लोहदगडाच्या अनियंत्रित वाहतूकीमुळे रस्त्यांची चाळण झाली असून दक्षिण गडचिरोलीत अपघातांची मालिका सुरू झालेली असून या वाहतूकीमुळे आणखी किती बळी घेणार? या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर ते देऊ शकत नाहीत. मात्र हे थांबविण्यासाठी विशेष कॉरिडॉर निर्माण करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारने स्वीकार केला असुन लवकरच त्याचे बांधकाम सुरू करण्यासाठी आपण पाठपुरावा करु. असे खासदार नेते यांनी स्पष्ट केले. तोपर्यंत सर्वांनीच वैयक्तिक काळजी घेतली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. जिल्ह्यातील शेतक-यांना बुधवार पासून दिवसा १२ तास वीज पुरवठा सुरू झाला असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## अभाविपचे दोन दिवशीय अभ्यासवर्ग मुल शहरात

**मूल । प्रतिनिधी**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ब्रह्मपुरी यांनी जिल्ह्याचे कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग म्हणजेच जिल्हा अभ्यास वर्ग दिनांक १ व २ डिसेंबर रोजी योग भवन क्रीडा संकुलन मूल येथे घेण्याचे ठरविले आहे. संपूर्ण जिल्ह्यातून १०० विद्यार्थी व विद्यार्थिनी या वर्गात सहभागी होणार आहेत. हे वर्ग एक तारखेला सकाळी १०.०० वाजता सुरू होऊन दोन तारखेला सायंकाळी ४.०० वाजता संपन्न होणार आहे.

या वर्गात विद्यार्थी परिषदेची आयाम गतिविधि कार्य व महाविद्यालयात अभावीप चे काम ,अभावीप ची कार्यपद्धती, अभावीप ची आचार पद्धती व परंपरा, अभाविप मध्ये येणारे प्रवास व त्याच्याशी संपर्क सोबतच महाविद्यालयातील अनेक विषयाला घेऊन व नवीन शैक्षणिक धोरण २०२३ याबद्दल विविध सत्र विविध परिसरातील वक्ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत तरी या अभ्यास वर्गात जिल्ह्यातील ब्रह्मपुरी, नागभीड, तळोधी, सावली, चिमूर, सिंदेवाडी, व मूल या तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ब्रह्मपुरी तर्फे करण्यात आले.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ज्ञान शील एकता

## पुलगावचे ग्रामिण रुग्णालय झाले रेफर रुग्णालय

### पुलगाव रुग्णालयात घडलेल्या प्रकाराची चौकशी– आ. रणजित कांबळे



पुलगाव – पुलगाव ग्रामीण रुग्णालयामध्ये २१ नोव्हेंबर रोजी घडलेल्या प्रकाराबाबत माहिती घेऊन चौकशी करण्यात येईल व दोषी व्यक्तींवर कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे जिल्हा आरोग्य अधिकारी यांना निर्देश देऊन पुलगाव ग्रामीण रुग्णालयात रिक्त असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या जागा त्वरित भरण्यात येतील,अशी प्रतिक्रिया आ. रणजित कांबळे यांनी सह्याद्रीचा राखणदार मध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तावर व्यक्त केली.आ. कांबळे यांचे जिल्यातील प्रशासकीय यंत्रणेवार चांगले नियंत्रण आहे. त्यामुळे पुलगावकरांच्या आरोग्य समस्यावर लवकर तोडगा निघेल, अशी आशा करायला हरकत नाही.





**पुलगाव । अविनाश भोपे**

पुलगाव चे ग्रामीण रुग्णालय हे रेफर रुग्णालय झालेले आहे. येथे आलेल्या प्रत्येक रुग्णाला साध्या साध्या आजारांसाठी उपचार प्राप्त होत नाही. रुग्णांना सरळ वर्धा, सेवाग्राम, सावंगीला जाण्याचा सल्ला दिला जातो.पुर्वी सर्पदंशासाठी येथे सर्व उपचार मिळत होते. परंतु आता सलाईन लावून रेफर केल्या जाते. काही दिवसापूर्वी एका मुलाला सर्पदंश झाला. धावपळ करीत ग्रामीण रुग्णालयात पोहोचले. तेथे सलाईन लाऊन रेफर केले. हे सलाईन सुद्धा व्यवस्थित लावले नव्हते. त्यामुळे अर्ध्या रस्त्यातून परत यावे लागले. पुन्हा सलाईन व्यवस्थित करून सावंगी रुग्णालयात नेले. परंतु उशीर झाल्यामुळे मुलगा वाचु शकला नाही. पुर्वी सर्पदंशाचे इंजेक्शन पुलगावलाच दिले जात होते. विविध उपायाद्वारे विष बाहेर काढले जात होते. पण आता सर्वच ईश्वर भरोसे आहे.



भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा प्रदेश अध्यक्ष संजय गाते यांनी स्थानिय आमदाराच्या दुर्लक्षामुळे पुलगाव समस्यांचे आगर बनले आहे. पुलगाव येथील ग्रामीण रुग्णालयावर देवळी, आर्वी,धामणगाव इत्यादी तालुक्यातील अनेक गावेआरोग्य सेवेसाठी अवलंबून आहेत.परंतु प्राथमिक सुविधा सुद्धा रुग्णालयात उपलब्ध नाही. छोट्या छोट्या कारणासाठी वर्धा, सेवाग्राम, सावंगी पाठवले जाते. आमदार दुर्लक्ष करीत असले तरी जनतेच्या समस्यांसाठी जवाबदारी म्हणून शासन दरबारी समस्या मांडून त्या सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार आहे.राज्यात भाजपा युतीचे सरकार असल्याने जनतेच्या समस्याना भाजपा नेते न्याय मिळवून देतात का ? याकडे पुलगावकरांचे लक्ष लागले आहे.


## संपादकीय

# माणुसकीच्या उजेडात...

'या पर्वतराजीने एकच सांगितले, विनम्र राहा' हे वाक्य आहे उत्तराखंडमध्ये सिल्क्यारा ते पोलगाव दरम्यान सुरू असलेल्या बोगद्यात अडकलेल्या ४१ मजुरांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी प्रयत्नरत राहिलेल्या ऑस्ट्रेलियन अरनॉल्ड डिक्स यांचे.ते पेशाने भूवैज्ञानिक, अभियंता आणि वकील आहेत. चारधाम यात्रा महामार्ग प्रकल्पांतर्गत उत्तरकाशी ते यमुनोत्री दरम्यानचे अंतर २६ किलोमीटरने कमी करण्यासाठी या साडेचार किलोमीटरच्या बोगद्याचे काम सिल्क्यारा आणि पोलगाव असे दोन्ही बाजूंनी सुरू होते.बोगद्याचा अंतर्गत भाग १२ नोव्हेंबर रोजी कोसळल्याने ४१ मजूर अडकले होते. सतरा दिवस अथक सुरू असलेल्या मदतकार्याला आणि बचावपथकाच्या भगीरथ प्रयत्नांना अखेर यश आले आणि त्या सगळ्यांची सुखरूप सुटका करण्यात यश आले.एखाद्या विकासप्रकल्पाच्या कार्यवाहीच्यावेळी अशा प्रकारच्या आपत्तीवर यशस्वीरीत्या केलेली ही मात कौतुकास्पद आहे. जी राज्यव्यवस्था व समाजव्यवस्था मानवी जीविताला सर्वोच्च महत्त्व देते, ती श्रेष्ठ म्हटली पाहिजे.भारतीयांनी या घटनेत त्याचा प्रत्यय दिला. सारा देश श्वास रोखून आपल्या 'श्रमवीरां'च्या सुखरुप सुटकेकडे डोळे लावून बसला होता. त्यांच्या सुटकेची वार्ता कळताच देशभरात आनंद व्यक्त झाला. अद्ययावत तंत्रज्ञान, त्याचे उपयोजन यापेक्षाही ही मानवी भावना महत्त्वाची.बचावमोहिमेत सामील सर्व घटकांची कामगिरी देशासाठी अभिमानाची बाब आहे. केंद्र व राज्य सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, लष्कराचे मद्रास सॅपर्स, राष्ट्रीय महामार्ग आणि पायाभूत विकास महामंडळ,सीमारस्ते संघटना तसेच खासगी संस्था-संघटना, अमेरिकी ऑगर मशीन आणि बोगद्यात अडकलेल्यांपर्यंत पोचण्याचा मार्ग मोकळा करणारे तज्ज्ञ कामगार, रॅट होल कामगार या सगळ्यांच्या संघटित, नियोजनबद्ध आणि अविरत प्रयत्नांना द्यावी तेवढी दाद कमी आहे.विकासाच्या वाटेवर अशा आव्हानात्मक प्रसंगांना तोंड द्यावे लागते, अडथळा पार करावा लागतो, तेव्हाच उद्याचा उषःकाल दिसतो. तथापि, विकासाच्या वाटेने जाताना जबाबदारपणा दाखवला नाही, सुरक्षिततेचे मापदंड, संकेत यांकडे दुर्लक्ष केले,तज्ज्ञांचा सल्ला झुगारला तर काय होते आणि किती किंमत चुकवावी लागते, याचाही धडा यानिमित्ताने मिळाला आहे. त्यामुळेच डिक्स यांच्या 'नम्रता' या शब्दाला बहुआयामी आणि सखोल असा गंभीर अर्थ आहे.हिमालय ही सर्वात 'तरुण' पर्वतराजी. तिच्या अंतरंगात सतत घुसळण सुरू असते. त्यामुळे त्याचा सगळा टापू भूकंपप्रवण आहे. या पर्वतराजीचा पाया ते माथा भुसभुशीत आहे. त्यामुळे त्या भागात रस्तेरुंदीकरण, पूल, बोगदे किंवा जलविद्युतप्रकल्पासारखे विकास कार्यक्रम, उपक्रम राबवताना तिथल्या पर्यावरणीय स्थितीचे वास्तव जाणून नियोजन करावे लागते.पण वेगवान विकासाच्या नावाखाली या गोष्टी नजरेआड करण्याचा प्रयत्न झाला. त्याची किंमत चुकवावीच लागते, हे आता कळले असेल. गेल्या दशकभरात तिथला विकास, नयनरम्य पूल आणि काळजाचा ठाव घेणारे रस्ते, बोगदे मोहक दिसले तरी त्याची पर्यावरणीय किंमत मोठ्या प्रमाणात चुकती करावी लागली आहे.वरचेवर घडणाऱ्या घटना त्याकडे अंगुलीनिर्देश करतात. ज्या 'रॅटहोल तंत्रा'द्वारे अडकलेल्या मजुरांना बाहेर काढले, त्यावरही आपल्याकडे बंदी घातलेली आहे. चारधाम यात्रा प्रकल्पाच्या एकूण कार्यवाहीसाठी सरकारने पर्यावरण मूल्यमापनाला दिलेली बगल या आपत्तीला कारणीभूत ठरली आहे.त्यामुळे बोगदा दुर्घटनेतून धडा घेऊन भूकंपप्रवण भागातील विकास प्रकल्पांच्या कार्यवाहीचे फेरमूल्यमापन करावे. त्याबाबत तज्ज्ञांकडून काही ठोस सूचना आल्या तर त्यांचा गांभीर्याने विचार करावा. एखादा प्रकल्प, उपक्रम दूरगामी घातक परिणाम करणारा असेल तर असे प्रकल्प वेळीच गुंडाळावेत.तिथे अहंकाराचा भाग आणू नये. चारधाम यात्रा महामार्गाबाबत तज्ज्ञांनी वारंवार इशारा देऊनही त्याकडे दुर्लक्ष केल्याची किंमत म्हणजे बोगदा दुर्घटना आहे, असे म्हटले जाते. सर्व कामगार बोगद्याबाहेर सुखरूप काढण्यात यश आले ही समाधानाची बाब.जोशीमठ शहराचे खचणे असो वा जलविद्युत प्रकल्पांबाबत असलेला स्थानिक जनतेतील रोष असो, यामागील कार्यकारणभाव लक्षात घ्यावा. उत्तराखंड सरकारने राज्यातील सर्व प्रकल्पांचे फेरमूल्यमापन करावे.सात सदस्यीय समितीच्या सूचनांची कार्यवाही केली तर या दुर्घटनेतून धडा घेतला असे म्हणता येईल. लाखो कोटी रुपयांचे विकास प्रकल्प देशभरात सुरू आहेत. आण्विक शक्ती म्हणून वेगाने विकसित होणारा देश आणि अर्थव्यवस्था असा लौकिक आपण मिळवत आहोत, ही अभिमानाची बाब आहे.विकास, त्यातही तांत्रिक, औद्योगिक, सामरिक, उच्च तंत्रज्ञान यात वेगाने प्रगती करत असताना त्या वाटेवर अपघात होणे, आपत्तीजनक घटना, पर्यावरणीय आणि नैसर्गिक समस्या येणे अनपेक्षित म्हणता येणार नाही. त्यामुळे विकास कार्यक्रम राबवताना अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी सक्षम आणि बळकट यंत्रणा चोवीस तास सज्ज असणे ही प्रगतशील देशासाठी महत्त्वाची बाब आहे.आपत्तीव्यवस्थापनाची यंत्रणा त्सुनामीच्या घटनेनंतर आपण अधिक बळकट केली. तद्वतच भूकंपासारख्या घटनांतूनही आपण धडे घेतले. पण पायाभूत सुविधा, महाकाय प्रकल्प साकारताना येणारे प्रसंग असोत, वा तेलखाणी, तेलशुद्धीकरण प्रकल्पातील दुर्घटना असोत, अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी तज्ज्ञांची फौज सुसज्जच हवी, हे यानिमित्ताने अधोरेखित झाले आहे.जगभरातून आणलेली यंत्रसामग्री, तज्ज्ञ यांची मदत कामी आली, हेही उल्लेखनीय आहे. अर्थात, या घटनेच्या निमित्ताने देशभरातील सर्व तज्ज्ञांनी दाखवलेली कौशल्ये आणि समन्वय नवा हुरूप देऊन गेला आहे. पण महासत्तेची स्वप्ने पाहात असताना अशा प्रकारची तांत्रिक कुशलता, सामर्थ्य आपणही विकसित केले पाहिजे, हाही धडा या घटनेने दिला आहे.

# ज्ञानाचा महाकल्लोळ

काल-परवापर्यंत कृत्रिम बुद्धिमत्ता, म्हणजे आर्टिफिशियल इंटलिजन्सचे जे विश्व प्रयोगशाळांच्या चार भिंतींमध्ये बंदिस्त होते; ते एकदम आता ऐन मैदानात आले आहे. साऱ्या जगभर 'एआय' हा परवलीचा शब्द झाला आहे. मनोरंजनापासून शेअर बाजारापर्यंत आणि वैद्यकीय उपचारांपासून खासगी किंवा सरकारी प्रशासनापर्यंत सर्वच क्षेत्रांत असंख्य नव्या शक्यता निर्माण झाल्याच्या किंवा होत असल्याच्या बातम्या क्षणोक्षणी येऊन आदळत आहेत.'एआय'चा गैरवापर होऊन कोणते आणि कशा प्रकारचे गुन्हे घडू शकतात, याबद्दलही तज्ज्ञांचे इशारे पाठोपाठच येऊ लागले आहेत. थोडक्यात, मानवी समाजाची माहिती घेण्याची क्रिया, त्याची ज्ञानप्रक्रिया आणि विश्लेषण करण्याची प्रेरणा; तसेच प्रत्यक्ष कृती, हे सारेच पुरते बदलून जाण्याची शक्यता आहे. अशा वेळी, 'मायक्रोसॉफ्ट', 'चॅटजीपीटी' आणि 'गुगल' या तीन बलाढ्य खेळाडूंमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात कोण पुढे जातो आणि अधिकाधिक वेगवान व चतुरस्र सेवा ग्राहकांना देतो, याची जबरदस्त स्पर्धा सुरू होण्याची चिन्हे आहेत. हा ज्ञानाचा महाकल्लोळ प्रत्यक्ष मानवी जीवनाला कितपत उपकारक ठरतो आणि त्याचे गुंतागुंतीचे बनत चाललेले प्रश्नोपनिषद खरोखरच कितपत सोडवतो, हे अद्याप नीट समजलेले नाही. 'ओपन एआय' या कंपनीच्या 'चॅटजीपीटी-४' या सर्च इंजिनने या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या खेळाचे मैदान दोन वर्षांपूर्वी सर्वसामान्यांसाठी पहिल्यांदा मोकळे केले होते. त्यानंतर, 'मायक्रोसॉफ्ट'ने 'बिंगएआय' हे 'सर्च टूल' आणून गुंतागुंतीच्या विषयांचा शोध घेण्याचा आणि केवळ माहिती न पुरविता तुलनात्मक चित्र समोर ठेवण्याचा दावा केला. 'गुगल'ने 'बार्ड' हे 'सर्च टूल' आणतानाच त्यांच्या पद्धतीने एकदम ४६ भाषांमध्ये आणि जगातील २३८ देशांमध्ये नेले. 'गुगल', 'मायक्रोसॉफ्ट' आणि 'ओपन एआय' यांच्यातील स्पर्धेची पहिली तुंबळ फेरी सध्या चालू असून, 'गुगल'चे आधीच तयार असणारे प्रचंड जाळे मदतीला येते का, हे आता कळेलच.'गुगल'चे 'बार्ड' येत असतानाच, 'ओपन एआय'ने एक पाऊल पुढे टाकून, 'चॅटजीपीटी' वापरणाऱ्या व्यक्तींना त्यांचे स्वतंत्र टूल बनविण्याची सुविधा देण्याचे ठरविले. अलीकडेच त्याचेही उद्घाटन झाले आहे. 'ट*' म्हणजे 'क्यू स्टार' असे नाव असणारे हे टूल अनेक गणितीय प्रश्न किंवा समीकरणे स्वतःच सोडवू शकते. मात्र, या टूलचा बाजारात कसा आणि कितपत उपयोग करायचा, याबाबत शंका आहेत. या तीन स्पर्धकांमध्ये मध्येच घडलेले उपकथानक म्हणजे, 'ओपन एआय'मधून हकालपट्टी झालेले सॅम आल्टमन यांचे पुनरागमन. दरम्यानच्या काही दिवसांत 'ओपन एआय'मधील किमान सातशे अभियंत्यांनी आल्टमन परत येणार नसेल, तर आम्ही 'मायक्रोसॉफ्ट'मध्ये जातो, असा इशारा दिला होता. तसे झाले असते तर 'गुगल', 'ओपन एआय' आणि 'मायक्रोसॉफ्ट' यांच्या स्पर्धेला नवेच रूप आले असते. मात्र, आल्टमन परत आले आहेत. 'एआय'च्या क्षेत्रातले मानवी वादळ तूर्त तरी पेल्यातले ठरले आहे.या तिहेरी स्पर्धेत 'गुगल'चा स्वाभाविक



फायदा काय आहे, हे समजावून घ्यायला हवे. आज जगात १८० कोटी नागरिक 'जीमेल' वापरतात. हा आकडा जगाच्या लोकसंख्येच्या २२ टक्के आहे. ज्या ग्राहकांनी दीर्घ काळ 'जीमेल' वापरलेला नाही, त्यांची सगळी खाती रद्दबातल करण्याचा निर्णय 'गुगल'ने नुकताच घेतला आहे. हा अतिरिक्त बोजा कमी झाल्यावर, 'गुगल'ने 'जीमेल'मध्ये ताकदीने 'एआय' वापरायला सुरुवात केली, तर ते स्पर्धकांच्या खूप पुढे जाऊ शकतील. एक साधे उदाहरण म्हणजे, एखाद्या उमेदवाराला प्राथमिक तपशील दिल्यानंतर, जर मेलवरच उत्तम आवेदनाचा नमुना ड्राफ्टमध्ये तयार मिळत असेल, तर त्याचे कामच झाले. हे 'जीमेल'च्या साह्याने 'बार्ड' करू शकणारे अत्यंत प्राथमिक काम आहे. १८० कोटींचा प्रचंड ग्राहकवर्ग असणारी 'गुगल' कंपनी असंख्य प्रकारे आपले 'एआय'चे शस्त्र घेऊन, क्षणोक्षणी मदतीला धावून येऊ शकेल. मुळातच कृत्रिम प्रज्ञेचा अनेक प्रकारचा धोका वैज्ञानिक लक्षात आणून देत आहेत. 'डीफ फेक' म्हणजे हुबेहूब खोटारडेपणाचा धोका तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही बोलून दाखविला आहे. याशिवाय, अनेक धोके आहेत. यातला आर्थिक फसवणूक होण्याचा, चुकीचा डेटा दिल्यामुळे 'एआय'ने भलतेच निष्कर्ष काढण्याचा, 'एआय'चा स्वयंप्रज्ञाखेळ अनियंत्रित होऊन भलत्याच दिशेला जाण्याचा असे अनेक धोके आहेत. या तीन बलाढ्य स्पर्धकांची कुस्ती चालू असताना, हे धोके दूर करण्याकडे लक्ष कोण देणार आणि जगातील कोट्यवधी नागरिकांना असत्याच्या फशी पडू न देण्याची जबाबदारी कोणाची, हा पुढचा प्रश्न आहे. सरकार आणि तंत्रवैज्ञानिकांच्या मदतीने 'डीप फेक'वर आपण नियंत्रण मिळवू, असे 'गुगल'ने म्हटले आहे. तसे व्हायला हवे. काही महिन्यांपूर्वी 'मायक्रोसॉफ्ट'च्या 'एआय टूल'ला अधिक जाहिराती मिळत असल्याच्या बातम्या आल्या होत्या. या स्पर्धेला हेही अंग आहे, हे विसरता कामा नये. या सगळ्या युद्धात वापरकर्ते, म्हणजे आपली जबाबदारी किती तरी पटींनी वाढणार आहे. त्यांना शहाणे किंवा सावध कोण करणार, या प्रश्नाचे खरे उत्तर अर्थातच 'एआय' देणार नाही!

# नवीन बहुपक्षीयतेची पहाट

भारताने 'जी-२०'चे अध्यक्षपद स्वीकारले त्याला एक वर्ष पूर्ण झाले आहे. 'वसुधैव कुटुंबकम', 'एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' या भावनेच्या पुनर्जागरणाचा, त्याप्रती पुन्हा वचनबद्धता व्यक्त करण्याचा आणि ती प्रतिबिंबित करण्याचा हा क्षण आहे. ..'जी-२०' अध्यक्षपद ब्राझीलला सुपूर्द केले जात असतानाच्या टप्प्यावर अध्यक्षपदाच्या काळात भारताने बजावलेल्या भूमिकेवर एक दृष्टिक्षेप.भारताने 'जी-२०' अध्यक्षपदाची जबाबदारी गेल्या वर्षी स्वीकारली तेव्हा जग बहुआयामी आव्हानांनी ग्रासले होते. कोविडच्या साथीतून सावरणे, हवामानबदलविषयक धोके, आर्थिक अस्थिरता आणि विकसनशील राष्ट्रांमध्ये कर्जाचा प्रचंड बोजा, अशी अनेक आव्हाने होती.बहुपक्षीयवाद कमी होत असताना हे सर्व घडत होते. संघर्ष आणि स्पर्धेच्या अशा स्थितीत विकास, सहकार्याला फटका बसला आणि प्रगतीत अडसर निर्माण झाला. 'जी -२०' चे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर, भारताने मानवकेंद्रित प्रगतीच्या दृष्टिकोनावर भर दिला.आपल्याला काय विभाजित करते, यापेक्षा आपल्याला काय एकत्र आणते, याचे स्मरण जगाला करून देण्याचा भारताचा उद्देश होता. शेवटी, जागतिक संवाद विकसित होणे भाग पडले. अनेकांच्या आकांक्षांना वाट मिळवून देण्यासाठी काहींचे हितसंबंध बाजूला ठेवावे लागले. यासाठी बहुपक्षीयतेची मूलभूत सुधारणा आवश्यक होती, हे आपण जाणतोच.सर्वसमावेशक, महत्त्वाकांक्षी, कृतिकेंद्रित आणि निर्णायक या चार शब्दांनी 'जी २० अध्यक्ष' म्हणून आमचा दृष्टिकोन परिभाषित केला आणि 'जी-२०' सदस्यांनी एकमताने स्वीकारलेले नवी दिल्ली नेत्यांचे घोषणापत्र ही तत्त्वे पूर्ण करण्याच्या आमच्या वचनबद्धतेची साक्ष आहे. सर्वसमावेशकता आमच्या अध्यक्षपदाच्या केंद्रस्थानी राहिली.जी-२० चे कायम सदस्य म्हणून आफ्रिकन संघाच्या समावेशाने ५५ आफ्रिकी देश या मंचाशी जोडले गेले आणि या मंचाचा विस्तार जागतिक लोकसंख्येच्या ८०टक्क्यापर्यंत केला. या सक्रिय भूमिकेने जागतिक आव्हाने आणि संधींवर अधिक व्यापक संवादाला चालना दिली आहे.भारताने दोन टप्प्यांमध्ये बोलावलेल्या 'व्हॉइस ऑफ द ग्लोबल साउथ समिट' ने बहुपक्षीयतेची नवी पहाट उजाडली. अशा प्रकारची परिषद प्रथमच आयोजित केली गेली. ग्लोबल साउथच्या (जगाच्या दक्षिणेकडील विकसनशील देशांच्या) चिंता भारताने आंतरराष्ट्रीय मुख्य प्रवाहात आणल्या आणि विकसनशील देश जागतिक मताला आकार देण्यामध्ये आपले उचित स्थान मिळवू शकतील, अशा युगाची सुरुवात केली. सर्वसमावेशकतेच्या तत्त्वामुळे 'जी-२०' च्या आयोजनात भारताच्या देशांतर्गत दृष्टिकोनाचाही अंतर्भाव होऊन हे अध्यक्षपद जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीला साजेसे 'लोकांचे अध्यक्षपद' बनले. 'जन भागीदारी' (लोकसहभाग) कार्यक्रमांच्या माध्यमातून भारताची 'जी-२० ' अध्यक्षता १.४ अब्ज नागरिकांपर्यंत पोहोचली. यात सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश भागीदार म्हणून सहभागी झाले. महत्त्वपूर्ण घटकांवर, आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष हे 'जी-२०' च्या व्यवस्थेशी सुसंगत आणि व्यापक विकासात्मक उद्दिष्टांवर राहील, याची सुनिश्चिती भारताने केली. २०३०च्या अजेंडाच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर, शाश्वत विकासउद्दिष्टे साध्य करण्याच्या बाबतीत प्रगती साधण्यासाठी आरोग्य, शिक्षण, लिंगभाव समानता, पर्यावरणीय शाश्वतता आणि यासह परस्पर संबंधित मुद्द्यांवर वास्तवदर्शी, कृतिभिमुख दृष्टिकोनासह भारताने 'जी-२०-२०२३ कृती आराखडा' मांडला. या प्रगतीला चालना देणारे महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे मजबूत डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा. यासंदर्भात 'आधार', 'यूपीआय' आणि 'डिजिलॉकर' यासारख्या डिजिटल





नवकल्पनांचा क्रांतिकारक प्रभाव अनुभवलेल्या भारताने आपल्या शिफारशींमध्ये निर्णायक भूमिका बजावली. 'जी-२०' च्या माध्यमातून आम्ही डिजिटल सार्वजनिक पायाभूत भांडार यशस्वीरीत्या पूर्ण केले. जागतिक तांत्रिक सहकार्यातील ही एक महत्त्वपूर्ण प्रगती आहे. १६ देशांमधील ५०हून अधिक डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा असलेले हे भांडार 'ग्लोबल साऊथ' देशांना सर्वसमावेशक प्रगतीचे मार्ग खुले करण्यात, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात, अवलंबण्यात आणि त्या अद्ययावत करण्यात साहाय्य करेल. 'एक पृथ्वी'साठी तातडीचे, शाश्वत आणि न्याय्य बदल घडवून आणण्यासाठी आम्ही महत्त्वाकांक्षी आणि समावेशक ध्येय ठेवले आहे. 'नवी दिल्ली घोषणापत्रा'तील 'हरित विकास करारा'त जी सर्वंकष मार्गदर्शक तत्वे समाविष्ट आहेत, त्यात रोजगार आणि पर्यावरण परस्परपूरक आहे. वस्तूंचा उपभोग, वापर पर्यावरणपूरक आहे आणि उत्पादने पर्यावरणस्नेही आहेत. 'जी-२०' नवी दिल्लीचे घोषणापत्र या सर्वांशी सुसंगत आहे.यात २०३० पर्यंत जागतिक अक्षय ऊर्जाक्षमता तिप्पट करण्याचे महत्वाकांक्षी ध्येय ठरविण्यात आले आहे. यासोबतच जागतिक जैव इंधन सहकार्याची स्थापना; तसेच हरित हायड्रोजनला एकत्रित प्रोत्साहन, अधिक स्वच्छ, अधिक हरित जग निर्माण करण्याची 'जी-२०' देशांची महत्त्वाकांक्षा कुणीही नाकारू शकत नाही. भारताच्या तत्त्वज्ञानाचा तर हा कायमच गाभा राहिलेला आहे.शाश्वत विकासपूरक जीवनशैली (Life for Sustainable Development - LiFE), या माध्यमातून आमच्या पुरातन शाश्वत परंपरांचा जगाला लाभ मिळू शकतो. या घोषणापत्रातून, पर्यावरणीय न्याय आणि समानता, ग्लोबल नॉर्थकडून शाश्वत आर्थिक आणि तांत्रिक सहाय्य याविषयी आमची कटिबद्धता अधोरेखित होते.विकसनशील देशांना, २०३० पर्यंत आपली ठरवलेली राष्ट्रीय योगदाने पूर्ण करण्यासाठी ५.९ ट्रिलियन डॉलर इतक्या रकमेची गरज असल्याचे, 'जी-२०' संघटनेनेही लक्षात घेतले आहे. यासाठी लागणारी प्रचंड संसाधने बघता,'जी-२०' ने अधिक चांगल्या, मोठ्या आणि अधिक कार्यक्षम बहुआयामी विकास बँकांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. सध्या, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सुधारणांमध्ये भारत आघाडीची भूमिका बजावत आहे, यामुळे आधिक न्याय्य जग निर्माण होण्याची अपेक्षा आहे.लिंगभाव समानता या घोषणापत्राच्या केंद्रस्थानी आहे. त्या पार्श्वभूमीवर पुढील वर्षी महिला सक्षमीकरणासाठी एक समर्पित कार्यगट बनविण्यात येणार आहे. भारताचे 'महिला आरक्षण विधेयक-२०२३' महिलाप्रणीत विकासासाठी आमच्या कटिबद्धतेचे उदाहरण आहे.त्यात संसद आणि विधिमंडळात महिलांसाठी एक तृतीयांश जागा राखीव ठेवण्याची तरतूद आहे.महत्त्वाचे प्राधान्यक्रम, धोरण सुसंगतता, विश्वासार्ह व्यापार आणि महत्त्वाकांक्षी हवामानबदल संदर्भातील उपायांची कार्यवाही यासाठी सहकार्य, हा 'नवी दिल्ली घोषणापत्रा'चा आत्मा आहे.आपल्या अध्यक्षतेच्या काळात 'जी-२०' परिषदेत ८७ निष्पत्ती अहवाल सादर केले आणि ११८ दस्तावेज स्वीकारण्यात आले. ज्यांचे प्रमाण पूर्वीच्या परिषदांच्या तुलनेत लक्षणीयरीत्या अधिक आहे. 'जी-२०' अध्यक्षतेच्या काळात, भारताच्या नेतृत्वात भूराजकीय मुद्दे आणि त्यांचे आर्थिक विकास आणि विकासावर होणारे परिणाम यावर चर्चा घडून आल्या.दहशतवाद आणि निरपराध नागरिकांच्या अविचारी हत्या मान्य नाहीत, आणि आपण त्याबाबत 'झीरो टॉलरन्स' चे धोरण ठरवून त्याचा सामना केला पाहिजे. शत्रुत्व न ठेवता आपण मानवतेला जवळ केले पाहिजे आणि हा युद्धाचा काळ नाही, याचा पुनरुच्चार केला पाहिजे.आमच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात भारताने विलक्षण कामगिरी केली याचा मला आनंद आहे. बहुपक्षीयतेचे महत्त्व पुन्हा प्रस्थापित केले, 'ग्लोबल साउथ'चा आवाज जगाच्या व्यासपीठावर आणला, विकासाच्या धोरणांचे नेतृत्व केले आणि जगभरात महिला सक्षमीकरणासाठी लढा दिला.आता आम्ही 'जी-२०' अध्यक्षपद ब्राझीलला सुपूर्द करत आहोत, असे करताना आम्हाला खात्री आहे की, मानवता, शांतता आणि समृद्धीसाठी आपण उचललेल्या एकत्रित पावलांचे सकारात्मक परिणाम येणाऱ्या काळात जाणवत राहतील.

# मतदार नोंदणीसाठी दहा दिवसच मुदत

**सोलापुर । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीपूर्वी सध्या १ जानेवारी २०२४पर्यंत ज्या तरुण-तरुणींना १८ वर्षे पूर्ण होणार आहेत, त्यांची मतदार नोंदणी सुरू आहे. १८ वर्षे पूर्ण होऊनही ज्यांनी मतदार नोंदणी केलेली नाही, त्यांनाही नोंदणी करता येणार आहे. त्यासाठी ९ डिसेंबरपर्यंत शेवटची मुदत देण्यात आली आहे.राज्यात आता एप्रिल २०२४ मध्ये लोकसभेची निवडणूक होईल. त्यासाठी १ जानेवारी २०२४ची मतदार यादी ग्राह्य धरली जाणार आहे. सोलापूर जिल्ह्याचे निवडणूक शाखेचे उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व बीएलओंनी जिल्ह्यातील साडेतीन मतदान केंद्रांवर जाऊनही मतदार नोंदणी केली आहे.विशेष बाब म्हणजे १ जुलै ते २९ नोव्हेंबर २०२३ या काळात सोलापूर जिल्ह्यात २५ हजार नवमतदार वाढले आहेत. ते सर्वजण १८ ते १९ वयोगटातील आहेत. आता ज्या तरुण-तरुणींना १ जानेवारी २०२४पर्यंत १८ वर्षे पूर्ण होणार आहेत, त्यांनाही मतदार नोंदणीत सहभागी होता येणार आहे.तालुक्यातील तहसील कार्यालयातील निवडणूक शाखेत किंवा बीएलओंकडे त्यांना अर्ज देता येईल. त्याशिवाय स्वत:च्या मोबाईलवरून किंवा ऑनलाइन केंद्रांवरूनही मतदार नोंदणी शक्य आहे. ज्यांनी नोंदणी केली नाही, त्यांनी मतदार नोंदणी करून लोकशाहीच्या उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्ह्याच्या निवडणूक शाखेने केले आहे.नवीन मतदारांना घरबसल्या मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी व इतर निवडणूकविषयक सुविधा मिळविण्यासाठी वोटर हेल्पलाइन प उपयुक्त आहे. निवडणूक आयोगाने तयार केलेले प डाऊनलोड करून घ्यावे.कोणत्याही शासकीय कार्यालयात न जाता पद्वारे नवीन मतदारांना घरबसल्या मतदार यादीत नाव समाविष्ट करता येते. त्यासाठी योग्य कागदपत्रे अपलोड करावी लागतात. दुसरीकडे अस्तित्वात असलेल्या मतदारांना नावात दुरुस्ती व छायाचित्रात बदलही करता येतो.मृत मतदाराचे नाव नातेवाईक वगळू शकतात. तसेच, घरपोच मोफत मतदान ओळखपत्रही मिळविता येते. गुगल प्ले स्टोअरवरील https://play.google.com/store/apps/details?id=com.eci.citizen या लिंकच्या माध्यमातून या सुविधेचा लाभ घेता येईल.लोकसभा निवडणुकीसाठी १ जानेवारी २०२४ची मतदार यादी ग्राह्य धरली जाणार आहे. मतदार नोंदणीसाठी ९ डिसेंबरपर्यंत मुदत आहे. ज्या तरुण-तरुणींचे येणाऱ्या १ जानेवारीपर्यंत १८ वर्षे पूर्ण होतील, त्यांनाही मतदार नोंदणी करता येईल.



# कोकणवासीयांचा राजकारणासाठी वापर होणार नाही-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**रत्नागिरी**-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रत्नागिरीत सुरू झालेल्या कोका-कोला कंपनीच्या प्रकल्पाचे भूमिपूजन केले. तसेच कोका-कोला कंपनीची २०१५ मध्ये येथे येण्याची इच्छा होती, असे शिंदे म्हणाले. तसेच यावेळी त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या अमेरिका दौऱ्याचाही उल्लेख केला. तर भाषणात शिंदेंनी प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांवर सडकून टीकाही केली.पुढे बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, कोका-कोला कंपनीचे देशभरात विविध ६० उत्पादनं आहेत. तेथे आज हजारो कर्मचारी काम करत आहेत. या कंपनीने २०२३ मध्ये भारतात एकूण १२ हजार ८४० कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. कोका-कोलासारखी कंपनी रत्नागिरीत उभी राहत आहे. त्यामुळे लोकांना रोजगार उपलब्ध होईल. सरकारची स्थानिकांना रोजगार देण्याची भूमिका आहे. व्यवस्थापनानेही या कंपनीत स्थानिकांना प्राधान्य दिलं पाहिजे, अशी सरकारची भूमिका आहे. असे शिंदे म्हणाले.कोका-कोला कंपनीची २०१५ मध्ये येथे येण्याची इच्छा होती. त्यावेळी आत्ताचे उपमुख्यमंत्री आणि तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अमेरिका दौऱ्यात असताना याबाबत ठरलंही होतं. परंतु नंतर नवीन सरकार आलं. त्या सरकारबद्दल मी काही सांगत नाही. सरकार बदलल्यावर काय काय अडचणी येतात आणि त्याचं कारण काय यावर मी बोलणार नाही, असे एकनाथ शिंदेंनी म्हटलं.एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, खरं म्हणजे या कोकणात जेवढं काम करता येईल तेवढं केलं पाहिजे होतं. कारण कोकणाने नेहमीच बाळासाहेब ठाकरेंवर प्रेम केलं आहे. आमच्या सगळ्यांवर प्रेम केलं आहे. फक्त राजकारणासाठी कोकणी माणसाला वापरून घेण्याचं काम आम्ही करणार नाही, कधीही आमचं सरकार करणार नाही.''कोकणात सरकारने ठरवल्याप्रमाणे सगळी कामं केली आहेत. कारण आम्ही दिलेला शब्द पाळतो. मी आजपर्यंत भरपूर कागदांवर सह्या केल्यात. गुवाहाटीवरुन फोन करुन मी अनेक कामं केली आहेत, कारण सगळे प्रकल्प व्हायला हवेत ही एकच इच्छा होती'', असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं.

## लोकसभा निवडणुकीनंतर अजित पवार मुख्यमंत्री?

# स्वत: दादांनीच दिले संकेत; म्हणाले, निवडणुकीनंतर तुमच्या मनासारखे होईल



**कर्जत**-सर्वात आधी लोकसभा निवडणुका होणार आहेत. त्यानंतर तुमच्या मनातल्या निवडणुका आहेत. लोकसभा निवडणुका होऊ द्या, त्या नंतर तुमच्या मनासारखे होईल, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुख्यमंत्री पदाच्या चर्चेला पूर्णविराम दिला आहे. आमचे स्वागत करताना तरुणांनी अनेक प्रकारच्या घोषणा दिल्या. आम्हीही लोकशाहीचा आदर करणारे आहोत. त्यामुळे लोकसभा निवडणुका होईपर्यंत थांबा, त्या नंतर तुमच्या मनासारखे होईल, असेही अजित पवार यांनी म्हटले आहे.राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या वतीने कर्जतमध्ये दोन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये आमदार, माजी आमदार, खासदार, माजी खासदार आणि राज्यातले सर्व जिल्हाध्यक्षांना निमंत्रित करण्यात आले आहे. शिबिराच्या माध्यमातून आगामी निवडणुकांची तयारी करण्यात येणार आहे. या शिबिरात अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. या वेळी ते बोलत होते.राष्ट्रवादी काँग्रेसमधील वरीष्ठांना देखील मी लोकशाहीचा आदर करावा, असे सांगितले होते. मात्र, त्यांनी आमचे ऐकले नाही. त्यामुळे आम्हाला वेगळी भूमिका घ्यावी लागली, असेही अजित पवार यावेळी म्हणाले. लोकशाहीमध्ये लोकांच्या मताचा आदर करावा लागतो, तो आदर करणारे आम्ही आहोत, असेही अजित पवार यांनी म्हटले आहे.कर्जतमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे दोन दिवशीय राष्ट्रीय शिबिर सुरू आहे. यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी अजित पवार भेकड असते तर हे सरकार आले असता का? असा प्रश्न उपस्थित केला आहे. तसेच त्यांनी निवडणूक आयोगासमोर सुरू असलेल्या युक्तीवादासंदर्भात नाराजी व्यक्त केली. या युक्तीवादात अजित पवार यांना भेकड म्हटले गेल्याचे सुनील तटकरे यांनी पक्षाच्या राष्ट्रीय शिबिरात सांगितले

# एवढा उठापाठा कुणासाठी?:बच्चू कडू यांचा छगन भुजबळांना सवाल

## मराठा समाज कुणबी असून तो कुणबीच राहणार असल्याचा दावा

**मुंबई**-राज्यात आरक्षणावरून मराठा आणि ओबीसी यांच्यातील संघर्ष होण्याची चिन्हे आहेत. मराठ्यांना ओबीसीतूनच आरक्षण द्या, अशी मागणी मनोज जरांगे पाटील सातत्याने करत आहेत. तर, शिंदे समिती बरखास्त करा आणि मराठा समाजाला कुणबी म्हणून दिलेले प्रमाणपत्र रद्द करा, अशी मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी केली आहे. त्यामुळे, मराठा आणि ओबीसी संघर्ष पुढे येत असून छगन भुजबळांच्या सभेला मराठा समाज आणि मराठा नेते विरोध करत आहेत. यावर आमदार बच्चू कडू यांनीही छगन भुजबळ यांच्या भूमिकेवर मत व्यक्त करत किती मराठ्यांच्या आरक्षणाचा प्रश्न आहे, याचे गणितच मांडले आहे.''कोणासाठी एवढा उठापाठा सुरू आहे? ६० लाखांपैकी ३० लाख लोकांना प्रमाणपत्र भेटले. उरलेल्या लोकांनाही मिळणार आहे. सर्वांना ओबीसीचे प्रमाणपत्र मिळणारच. मराठा हा कुणबी आहे आणि तो राहणारच'' असे कडू म्हणाले.मराठ्यांना वेगळं काढून ओबीसींच भलं होणार नाही, ओबीसींची भलं करण्यासाठी आम्ही त्यांच्या पाठिशी आहोत.



एकूण ९ जिल्हे आहेत, तेथील कुटुबांची संख्या ४ लाख एवढी आहे. आपण ८ जिल्हे पकडले तर ८ जिल्ह्यातील एकूण संख्या ३२ लाख एवढी होईल. त्या ३२ लाखातील अर्धे बाद झाले, मग राहिले अर्धे १६ लाख. १६ लाखचे ४ गुणा केल्यास ६४ लाख होतात. आता, ३६ लाख लोकांना प्रमाणपत्र भेटलंय. राहिला विषय ३६ लाखांचा, त्याला तुम्ही विरोध करताय. पण, इकडे मराठा कायदेशीर मार्गाने कुणबी प्रमाणपत्र मिळत आहे, ते कोणीही रोखू शकत नाही, असे म्हणत आमदार कडू यांनी मराठा समाजात कुणीबीचा लाभ मिळणाऱ्यांची आकडेवारीच सांगितली.आता, १० ते १५ लाख मराठे राहिले आहेत. मात्र, यांनी बोभाटा केला की ५ कोटी मराठे ओबीसीत सामिल होणार. विदर्भातला बच्चू कडू ५० वर्षांपासून सामिल झालाय. विदर्भातील झाला, खान्देशातील झाला, पश्चिम महाराष्ट्रातला झाला, कोकणातलाही ५० वर्षे अगोदर झालाय. त्यामुळे, मराठ्यांना आता कुणबी प्रमाणपत्र मिळणारच आहे, असेही कडू यांनी स्पष्ट केले.मराठा आरक्षणावरून ओबीसी नेते छगन भुजबळ आणि मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आमनेसामने आले आहेत. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर जोरदार टीका केली जात आहे. मराठा कुणबी व कुणबी मराठा जात प्रमाणपत्रे देण्यासाठी नेमलेली शिंदे समिती व मागील दोन महिन्यांत दिलेली कुणबी प्रमाणपत्रे रद्द करा. ज्या सवलती सारथीच्या माध्यमातून मिळतात, त्या ओबीसींनाही द्या, अशी मागणी छगन भुजबळ यांनी हिंगोली येथील ओबीसी एल्गार महामेळाव्यात केली. यावरून आता दावे-प्रतिदावे केले जात आहेत.

## कापसाला किमान गेल्या वर्षी एवढा तर दर द्या!:आमदार जयंत पाटील यांची मागणी, राष्ट्रवादीचा आक्रोश मोर्चा जळगावात



**जळगाव**-नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे नेते आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली आहे. आम्ही सत्तेत असताना आताच्या सत्ताधाऱ्यांनी अवास्तव दर देण्याची मागणी केली होती. मात्र आम्ही तेवढी मागणी करणार नाही. किमान गेल्या वर्षीचा दर तरी कापसाला देण्यात यावा, अशी मागणी जयंत पाटील यांनी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शेतकरी आक्रोश मोर्चा आणि ट्रॅक्टर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्त ते जळगावात पत्रकारांशी बोलत होते.राज्यात अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पीक विम्याच्या बाबतीत सरकारने अनेक घोषणा केल्या. पण मदत मात्र त्यांच्यापर्यंत पोहोचलेली नाही, ही शेतकऱ्यांची थट्टा आहे. विदर्भात तुरीच्या पिकांचे, नंदुरबारमध्ये मिरचीचे तर जळगाव व नाशिकमध्ये द्राक्ष व कांद्याचे नुकसान झाले आहे. तसेच, या अवकाळी पावसामुळे जनावरांचेदेखील फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या सर्व नुकसानीचे पंचनामे करण्याची घोषणा सरकारने केली असली तरी त्याची अंमलबजावणी होईल असे वाटत नसल्याचेही ते म्हणाले.

# पीकविमा कंपनीच्या कर्मचाऱ्याला वडेट्टीवारांनी घेतले फैलावर कर्मचारी उद्धटपणे बोलत असल्याची शेतकऱ्यांनी केली तक्रार

**चंद्रपूर**-राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी गुरुवारी पीकविमा कंपनीचे कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले. विमा मंजूर होऊन दोन वर्षे झाली. मात्र, पैसे मिळाले नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली. तेव्हा ही अक्षम्य दिरंगाई पाहता वडेट्टीवारांचा संताप अनावर झाला.चंद्रपूर जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी वडेट्टीवार यांनी संवाद साधला. यावेळी त्यांनी शेतात बसून शेतकऱ्यांकडून नुकसानीची माहिती घेतली. राज्य सरकारने तातडीने पंचनामे करून चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली.शेतकऱ्यांशी संवाद साधल्यानंतर विजय वडेट्टीवार यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी पीकविमा दिला नाही तर आक्रमक भूमिका घेऊ असा इशारा राज्य सरकारला दिला आहे. तसेच त्यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा यावेळी ऐकून घेतल्या. तसेच शेतकऱ्यांशी उद्धटपणे बोलणाऱ्या कर्मचाऱ्याला वडेट्टीवार यांनी पाहणी दौऱ्यात चांगलेच फैलावर घेतले.वडेट्टीवार यांना एका शेतकऱ्याने पीकविमा कंपनीच्या कर्मचाऱ्यांना फोन केल्यावर ते आमच्याशी उद्धटपणे बोलत असल्याची तक्रार केली. यानंतर शेतकऱ्याची बाजू ऐकून वडेट्टीवार यांनी कर्मचाऱ्याला समोर बोलावून चांगलेच झापले. त्यांनी कर्मचाऱ्याला शेतकऱ्यांशी उद्धटपणे न बोलता त्यांची बाजू ऐकून घेण्याची तंबीही दिली. तसेच वडेट्टीवार यांनी या कर्मचाऱ्याला वरिष्ठ अधिकाऱ्याला फोनही करायला लावला. त्यांनाही फैलावर घेतले.गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे चंद्रपूर जिल्ह्यात पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये भात, कापूस आणि हरभरा पिकाचे नुकसान झाले असून अवकाळी पाऊस सुरूच असल्याने नुकसानीची आकडेवारी अधिक वाढणार आहे. द्राक्ष बागेसाठी एकरी दोन लाख खर्च येतो. अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे द्राक्ष घडांची अक्षरशः चाळण होवून शेतकऱ्यांचे लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे.२६ ते २८ नोव्हेंबरदरम्यान अवकाळी पाऊस, गारपीट यामुळे राज्यातील २२ जिल्ह्यांना फटका बसला आहे. कृषी विभागाच्या अहवालानुसार, ३ लाख ९३ हजार ३२५ हेक्टरवरील पिके, फळबागांचे नुकसान झाले. बुधवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतही याविषयी चर्चा करण्यात आली. महसूल, कृषी विभागाने तातडीने एकत्रित पंचनामे करावेत, ३३ टक्क्यांपेक्षा जास्त शेतीपिकांचे नुकसान झालेल्या प्रकरणात निधी मागणीचा प्रस्तावही तत्काळ पाठवावा, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.



# पहिल्या महिला साहित्य संमेलनात घडणार विविध कलाकृतीचे दर्शन

# ग्रंथदिंडी,वेशभूषा,रांगोळी,पुस्तक प्रकाशन,पुरस्कार वितरण,परिसंवाद व कवीसंमेलनाचा अद्भुत सोहळा

## मूल नगरीत घडणार पहिल्या महिला साहित्य संमेलनाचा इतिहास

**मूल । प्रतिनिधी**

झाडीबोली साहित्य मंडळ चंद्रपूर आणि झाडीबोली साहित्य मंडळ शाखा मुल यांच्या वतीने पहिल्यांदाच पहिले राज्यस्तरीय महिला झाडीबोली साहित्य संमेलन राष्ट्रमाता जिजाऊ नगरी बालविकास प्राथमिक शाळा मुल येथे रविवार दिनांक ३ डिसेंबर ला आयोजित केलेले असून , संमेलनाध्यक्ष जेष्ठ साहित्यिक शशिकला गावतुरे व स्वागताध्यक्ष प्रा. रत्नमाला भोयर यांचे उपस्थितीत राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज भैय्या अहिर यांचे हस्ते उद्घाटन ,प्रा. रत्नमाला भोयर यांचा प्रातिनिधीक कवितासंग्रह हीरदयातील खपली व सुनिता बुटे यांच्या मनभावना कवितासंग्रहाचे प्रकाशन तसेच झाडीबोली महिलारत्न पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे .या साहित्य संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे नवभारत विद्यालयपासून गांधी चौक ते बालविकास प्राथमिक शाळेपर्यंत निघणाऱ्या ग्रंथदिंडीत लोककला व लोकपरंपरेचे दर्शन घडविणाऱ्या वेशभूषा , लेझीम, बँडपथक , कवायती आणि वैशिष्ट्यपूर्ण झाकी प्रदर्शित करण्यासाठी मूल नगरीतील शिक्षक , सर्व कर्मचारी व विद्यार्थी आणि नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी होणार आहेत. झाडी गौरवासाठी शाहीर नंदकिशोर मसराम व गायिका विद्या कोसे यांच्या स्वरांची जुगलबंदी रंगणार आहे . रस्त्यांच्या दुतर्फा साहित्य नगरीत आकर्षक रांगोळ्याची आरास असेल .दुसऱ्या टप्प्यात लोकगीते आणि स्त्री साहित्य यावर प्रकाश टाकण्यासाठी अकोल्याच्या ज्येष्ठ साहित्य डॉ. प्रतिमाताई इंगोले यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. विशाखा कांबळे नागपूर , डॉ. कल्पना नरांजे नागपूर व रणरागिनी मंचाच्या अध्यक्षा संगीता बढे वर्धा यांचा परिसंवाद आयोजित केलेला आहे. तिसऱ्या टप्प्यात झाडीची बहिणाबाई ज्येष्ठ साहित्यिक अंजनाबाई खुणे वडेगाव यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कवीसंमेलन रंगणार असून त्यात राज्यभरातील अनेक कवयित्रींचा सहभाग असणार आहे . याच साहित्य संमेलनात झाडीपट्टीतील साहित्यिकांचा व झाडीबोलीच्या उत्थानासाठी महत्त्वपूर्ण ठराव घेण्यात येणार आहेत .तरी मूल नगरीत होऊ घातलेल्या वैविध्यपूर्ण महिला साहित्य संमेलनात राज्यभरातील सर्व साहित्यिक व साहित्य रसिकांनी , नागरिकांनी सहभागी व्हावे , असे आवाहन झाडीबोली साहित्य मंडळ चंद्रपूरचे अध्यक्ष अरुण झगडकर , ज्येष्ठ मार्गदर्शक ग्रामगीताचार्य बंडोपंत बोढेकर , सचिव लक्ष्मण खोब्रागडे , मूल शाखेचे अध्यक्ष सुखदेव चौथाले , वृंदा पगडपल्लीवार , सुनील बावणे , प्रभा चौथाले, नागेंद्र नेवारे , वर्षा भांडारकर , सुनीता बूटे , गणेश मांडवकर , विजय लाडेकर , नामदेव पीजदूरकर , परमानंद जेंगठे , पंडित लोंढे , प्रशांत भंडारे , रामकृष्ण चनकापुरे , सुनील पोटे , सुरेश डांगे , संतोष मेश्राम , मंगला गोंगले यांनी मूल येथे संपन्न झालेल्या पत्रकार परिषदेत केले .

**झाडीबोली साहित्य मंडळाच्या चळवळीत महत्त्वपूर्ण सहभाग घेऊन मंडळाच्या वतीने साहित्य प्रकाशित केल्याबद्दल या साहित्य संमेलनात प्रा. रत्नमालाताई भोयर ,मंगला गोंगले ,शितल कर्णेवार ,प्रीती जगझाप, वृंदा पगडपल्लीवार, किरण चौधरी, भारती तितरे ,गायत्री शेंडे व मंजुषा दरवरे या महिला साहित्यिकांना झाडीबोली महिलारत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे**

**– लक्ष्मण खोब्रागडे , सचिव' झा.बो.सा. मं.चंद्रपूर**

## दोन ट्रकची समोरा समोर धडक,एक जण जागीच ठार एक गंभीर जखमी

**चामोर्शी । प्रतिनिधी**

दोन मालवाहू ट्रकची समोरासमोर धडक बसल्याने ट्रक चालक जागीच ठार झाल्याची घटना दिनांक ३० नोव्हेंबर गुरुवारी रात्री साडे बारा एक वाजताच्या सुमारास आष्टी- चामोर्शी मार्गावरच्या अड्याळ (येनापूर ) नजीकच्या वळणावर घडली.धनलाल छोटेलाल म्हरसकोल्हे वय ४९ वर्ष रा. भागी ता. देवरी जिल्हा गोंदिया असे मृत ट्रकचालकाचे नाव आहे.सविस्तर वृत्त असे की मध्यरात्री एक वाजताच्या सुमारास लोह खनिज वाहतूक करणारी के.एल. भाटिया ट्रान्सपोर्टचा ट्रक क्रमांक सीजी ०८ ए ई ६३२२ चामोर्शी कडून आष्टी कडे येताना अड्याळ नजीकच्या वळणावर विरुध्द दिशेनं आष्टी कडून नारळ वाहतूक करणाऱ्या ट्रक क्रमांक के ए ५२ ए ४०७२ ला समोरा समोर धडक दिली



यात लोहखनीज वाहतूक करणाऱ्या ट्रकचालकाचा जागीच मृत्यू झाला तर दुसऱ्या ट्रकचा चालक गंभीर जखमी झाला. घटनेची माहिती मिळताच आष्टी पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरिक्षक गणेश जंगले आपल्या पथकासह घटनास्थळी पोहोचले व ट्रक मध्ये अडकलेल्या चालकास बाहेर काढून आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. घटनेचा पंचनामा करून मृत. ट्रकचालकाचे शव उत्तरीय तपासणीसाठी आष्टी ग्रामीण रूग्णालयात आणण्यात आले.आष्टी चामोर्शी मार्गावर ट्रकमुळे होणाऱ्या अपघाताचे प्रमाण दिवसंदिवस वाढत असून दोन दिवसाअगोदर झालेल्या येनापुर नजीकच्या अपघात स्थळापासुन हे अंतर दीड किलोमीटर अंतरावर आहे.

## सिरोंचा येथील शेतकऱ्यांना १२ तास विजपुरवठा होणार

### माजी पालकमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांनी दिलेला शब्द केला पूर्ण

**सिरोंचा । प्रतिनिधी**

सिरोंचा तहसील कार्यालय समोर काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी उपोषण केले होते. यात शेतकऱ्यांना वीजपुरवठा हे ८ तास वरून १२ तास करण्याची प्रमुख मागणी होती.या उपोषणाची माहिती मिळताच सिरोंचा येथे जाऊन माजी पालकमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांनी आंदोलनकर्त्यांशी बराच वेळ सकारात्मक चर्चा केली आणि त्यांचे उपोषण सोडविले होते. यावेळी शेतकऱ्यांनी विविध मागण्यांचे निवेदन राजेंना दिले होते त्यानुसार उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे माजी पालकमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा करून शेतकऱ्यांना १२ तास विज देण्याची त्यांची प्रमुख मागणी पूर्ण केली आहे. याबाबतचा आदेश २९



नोव्हेंबर रोजी काढण्यात आला .या निर्णयाने सिरोंचा तालुक्यातील अनेक गावांना फायदा होणार असून त्यांना वर्षांतून दोन पिके घेणे शक्य होणार आहे.सूर्यापल्ली, नंदिगाव, तमांदाला, भोगापूर, कारस्पल्ली, नारायपूर,अमरावती,मॅरिगुडम, आदीमुत्तापूर, तिगलगूडम या प्रमुख गावातील शेतकऱ्यांना या निर्णयाने दिलासा मिळाला असून त्यांनी माजी पालकमंत्री राजे अम्ब्रीशराव आत्राम यांचे आभार मानले आहे.

## माजी नगरसेवक विनोद कामडे यांचे निधन

**मूल । प्रतिनिधी**

जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या नगर परिषद मूलचे माजी नगरसेवक विनोद



कामडे यांना दोन वर्षांपूर्वी डोक्याच्या आजाराने ग्रासले होते . हलाखीच्या परिस्थितीमुळे शस्त्रक्रिया करण्यासाठी पैसे नव्हते याची माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून माहीत होताच मदतीचा ओघ सुरू झाला. आणि अवघ्या काही दिवसांत लाखो रुपये जमा झाले होते. त्या नंतर त्यांचा उपचार सुरु झाला होता.दोन वर्षापासून विनोद जीवनाशी संघर्ष करत असतांना अखेर आज त्याचा प्रयत्न थांबला आणि त्याने स्वास सोडला.ते म्हणतात ना जो आवडतो सर्वांना तोचि आवडे देवाला या उक्ती प्रमाणे असेच काहीसे घडले राजकीय क्षेत्रात पुढाकार घेऊन सातत्याने सामाजिक उपक्रमात अग्रेसर असणारा, जनसामान्यांसाठी नेहमीच कार्यतत्पर अशी ओळख असलेल्या विनोद कामडे.याचे आज निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर शुक्रवारला उमानदीवरील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.


## राजुऱ्यात 'सकाळ' च्या दारूविक्रीला अधिकाऱ्यांची मुक सहमती ?

### ६ ते ७ वाजताच तळीरामाना मिळतो 'एकच प्याला'

**राजुरा । प्रतिनिधी**

बियरबार, बियर शॉपी,वाईन शॉपी व देशी दुकानातून दारू विक्री करण्यासाठी निर्धारित वेळ दिली आहे. याच वेळेत परवाना धारकांनी दुकानांचे शटर उघडावे असे निर्देश देण्यात आले आहे.पण शहरातील काही परवानाधारकांनी निर्धारित वेळेला 'ठेंगा' दाखवून 'गुड मॉर्निंग' ला दारू विक्री सुरू केली आहे. त्यामुळे सकाळी ६ ते ७ वाजताच तळीरामाना 'एकच प्याला' मिळत आहे.या दारुविक्रेत्यांना दारू उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांची 'फूस' आहे का असा संतप्त सवाल नागरिक विचारात आहे.

शहरात दारूबंदी नंतर दारू दुकाने सुरू झाली आहे. त्यामुळे तळीरामाना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान



या परवानाधारकांना दारू दुकाने उघडण्यासाठी ठराविक वेळा दिल्या आहे.यात फक्त देशी दारूला सकाळी ८ वाजता दारूविक्री करता येते. मात्र काही बियरबार मध्ये 'गुड मॉर्निंग' लाच दारूविक्री सुरू होते.बारच्या मागच्या दरवाज्यातून सकाळी सात वाजताच तळीरामाना 'एकच प्याला' मिळत असल्याचे निदर्शनास येत आहे. वेळेला वाट्याण्याचा अक्षदा लावून रामप्रहरी दारूविक्री चा गोरखधंदा सुरू असल्याने संशय बळावला आहे.सकाळी तळीरामाची तहान भागत असली तरी वेळेच्या बांधनाचे काय असा सवाल विचारला जात आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागा च्या अधिकाऱ्यांना वाकोल्या दाखवून दुकानाचा मागच्या दरवाजा उघडत असल्याने या विक्रेत्यांचा पाठीराखा कोण असे एक ना अनेक प्रश्न निर्माण होत आहे. आजतागत एकाही विक्रेत्यांवर कारवाई झाली नसल्याने त्यांना अधिकाऱ्यांची फूस आहे का अशी शंका निर्माण होत आहे.

## पाचेगांव खुर्द मध्ये आजपासून बेमुदत साखळी उपोषणाला सुरुवात

### मनोज जरांगे पाटील यांच्या लढ्याच्या समर्थनार्थ समाज एकवटला

**पाचेगांव । प्रशांत मिसाळ:**
मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण मिळावे या मनोज जरांगे पाटील यांच्या लढ्याच्या समर्थनार्थ सकल मराठा समाज पाचेगांव खुर्द यांच्या वतीने आज शुक्रवार दि. १ डिसेंबर पासून बेमुदत साखळी उपोषणाला सुरुवात करणार असल्याचे तहसीलदार कणसे यांना निवेदन देऊन कळविण्यात आले असल्याचे सकल मराठा समाज पाचेगांव खुर्द यांच्या वतीने सांगण्यात आले.

राज्यात सध्या मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीच्या समर्थनार्थ ठिकठिकाणी आंदोलने चालू आहेत. मनोज जरांगे पाटील यांना महाराष्ट्रातून मराठा समाज तसेच ओबीसी समाज बांधवांकडून मोठ्या संख्येने पाठिंबा मिळत आहे. त्यांच अनुषंगाने पाचेगांव खुर्द येथील सकल मराठा समाज यांच्या वतीने करण्यात येणाऱ्या साखळी उपोषणाला ओबीसी समाजाचा पाठिंबा असून गावगाड्यातील ओबीसी व मराठा समाज एकत्र गुण्यागोविंदाने नांदत असल्याचे चित्र दिसत आहे.

पाचेगांव खुर्द येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक, हनुमान मंदिर येथे या साखळी उपोषणाला सुरुवात करण्यात आली असून पाचेगांव खुर्द, नलवडेवाडी, मिसाळवाडी, गायकवाड मळा, जुना मळा, घुले मळा येथील सर्व गावकरी पाळीपाळीने या साखळी उपोषणात सहभागी होणार असल्याचे आयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. तिसऱ्या टप्प्यातील उपोषणाच्या वेळी जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ पाचेगांव खुर्द येथील साखळी उपोषणाला मराठा समाजातील महिलांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवण्यात आला होता तसाच याही वेळी महिलांचा सहभाग नोंदवला जाईल असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

## नालायक सरकारला खड्ड्यात गाडून भगवा झेंडा फडकवूनच शिवसेना पुढे जाईल – उद्धव ठाकरे

**मुंबई–**शिवसेना सूडाच्या कारवायांमुळे मागे हटणार नाही. नालायक सरकारला खड्ड्यात गाडून त्यावर भगवा झेंडा फडकवूनच ती पुढे जाईल. मुंबईचे माजी महापौर व शिवसेनेचे उपनेते दत्ता दळवी यांना बुधवारी सकाळी पोलिसांनी घरात घुसून अटक केली. 'मिंध्यांनी स्व. आनंद दिघे यांच्यावर 'धर्मवीर' नामक चित्रपट काढला होता. त्या चित्रपटात दिघे हे नालायक गद्दारांना जी 'इरसाल' भाषा वापरतात त्याच उपाधीचा उल्लेख दळवींनी गद्दार हृदयसम्राटांच्या बाबतीत केला. त्याबद्दल पोलिसांनी त्यांना अटक केली. मग त्याच 'भोसऑऑऑ' या उपाधीचा वापर केल्याबद्दल 'धर्मवीर' चित्रपटाचे निर्माते, दिघे यांची भूमिका करणारे नटवर्य, त्या चित्रपटाचे आर्थिक आश्रयदाते यांच्यावरही गुन्हे दाखल करून पोलीस त्यांना अटक करतील काय? अशा शब्दात उद्धव ठाकरे गटाने राज्य



सरकावर टीका केली आहे.तुकारामांनी हे जे सांगितले ते समाजातील नालायक किंवा भुरटय़ा लोकांविषयी सांगितले, पण तुकाराम महाराज आज असते तर महाराष्ट्रातील 'मिंधे' सरकारने त्यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांची रवानगी देहू पोलीस स्टेशनच्या कोठडीत केली असती; कारण सत्य आणि परखड बोलणे हा आता दंडनीय अपराध झाला आहे. चोरांना चोर म्हणायचे नाही, गद्दारांना गद्दार म्हणायचे नाही. त्यांना युगपुरुष, महात्मा, धर्मात्मा म्हणा, असे राज्यातील मिंधे सरकारचे फर्मान आहे. यातील काही जणांची स्वतःला हिंदुहृदयसम्राट म्हणवून घेण्यापर्यंत मजल गेली आहे. राज्य एक प्रकारे सामाजिक, सांस्कृतिक बाबतीत अधोगतीस जात आहे. राज्यात अवकाळी पाऊस, गारपिटीने शेतकऱ्यांच्या जीवनात दुःखच दुःख आले. उभी पिके चिखलात आडवी झाली. प्रचंड नुकसान झालेय. शेतकरी बांधावर बसून धाय मोकलून रडत असताना राज्याचे 'मिंधे' मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री वगैरे राजस्थान, तेलंगणा, मध्य प्रदेशात निवडणूक प्रचारासाठी गेले. या नालायकीस काय म्हणायचे? स्वतःचे घर असे वाऱ्यावर सोडून इतर राज्यांतील भाजपाईंना खोके पोहोचविण्यात धन्यता मानणाऱ्यांना 'नालायक' नाही म्हणायचे तर काय म्हणायचे?

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .